मनोज कळमकर

# सद्रक्षणाय



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मनोज कळमकर

लिखित

पोलीसकथासंग्रह

# सद्रक्षणाय

# सद्रक्षणाय

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

सद्रक्षणाय (कथासंग्रह)

मनोज मधुकर कळमकर

पत्ता-श्री समर्थ निवास, घर क्र. 680,

स्वामी विवेकानन्द विद्यालयाजवळ,

पोस्ट-तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड

मेल आयडी-manojkalamkar76@gmail. com

मोबाईल क्रमांक-9765899878

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा  त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ८ जुलै २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोज मधुकर कळमकर



व्यवसाय-नोकरी. तसेच दैनिक पुढारी व दैनिक सकाळ खालापूर बातमीदार. रायगड माझा वृत्तवाहिनी प्रतिनिधी.

शिक्षण-डिप्लोमा इन जर्नालिझम. बीकाॅम.

आवडीनिवडी- चित्र काढणे, कविता करणे. शरिरसौष्ठव (व्यायाम करणे) छायाचित्रण.

वाचन-सर्व प्रकारचे लेखन. पुल ते शेती विषयक पोपटराव पवार. .

लेखन-विविध विषयावर कविता दिवाळी अंकात प्रसिद्ध.

सत्य घटनेवर आधारित क्राईम स्टोरी पुढारी तसेच दिवाळी अंकात प्रसिद्ध. तालुक्यातील पर्यटन स्थळावर लेखन.

पुढील योजना-ई साहित्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचणे.

लक्ष्य- सध्या व्यंगचित्र प्रशिक्षण सुरू आहे. तसेच वृत्तवाहिनीचे अँकरिग करताना क्राईम कथेवर आधारित मालिका प्रसारित करण्यासाठी प्रयत्न

# प्रस्तावना

माझं  पहिलंच पुस्तक! पहिली इयत्तेत जाताना जेवढा आनंद झाला होता तेवढाच आनंद होतोय.. नवीन दप्तर, नवीन गणवेष सर्व काहि नवीन.. तसंच हे "ई साहित्य" विश्व माझ्यासाठी नवोदिताला संधी घेवून आलंय..

क्राईम स्टोरी आणि सत्य घटनेवर आधारित. यामुळे रंजकता आणि सत्य याचा मेळ बसविण्याचा प्रयत्न केलाय. दैनिक पुढारी, सकाळ या दैनिकात काम करित असताना दररोज घडणाऱ्या घडामोडी वाचकांपर्यंत लेखणीतून पोहचवताना अनेक विषय हाताळायला मिळाले.

त्यात खालापूर तालुका म्हणजे सर्व प्रकारच्या बातम्यांचे भांडार. मुंबई पूण्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या खालापूरात गुन्हेगारी घटना नेहमी घडत असल्यामुळे वार्तांकन करताना खोलवर बातमी मिळविण्याची धडपडीतून गुन्हा कसा घडला याबाबत उत्सुकता आणि त्यातून होत जाणारा उलगडा याचे कुतूहल मला असायचे. या कथा स्वरूपात येण्यासाठी दैनिक पुढारीचा सर्वात मोठा वाटा आहे. दर रविवारी क्राईम स्टोरी हे सदर सुरू केल्यामुळे अनेक कथा सुचल्या.

थोडंसं पाठिमागे जावू कारण घरात असलेला पोलीसी वावर, गुन्हा तपासायची पद्धत आणि पोलीसी खाक्या कसा असतो याचा अनुभवामुळे कथेची मांडणी कशी असावी याचे मार्गदर्शन आपोआप मिळाले. वडिल पोलीस खात्यात पस्तीस वर्ष नोकरी करून सहाय्यक फौजदार म्हणून निवृत झालेले तर मोठा भाऊ महेश दादा देखील पोलीस खात्यातच. शिवाय दादा स्वतः क्राईम विभागात काम करताना अनेक गुन्हे ऊघडकिस आणण्यात आघाडीवर असल्यामुळे अनेक कथांचे खाद्य मिळाले. गुन्हेगारी विषय कथेत वेगळेपण देण्याचा प्रयत्न केला आहे. ई

साहित्य प्रतिष्ठानचे सामंत सरांचे आभार.. मला कायम प्रोत्साहित करताना ते चालवित असलेली ई चळवळीत मला सामावून घेत एक नवीन प्रवासाचे ठिकाण दाखविले. रायगडचे पोलीस अधिक्षक अनिल पारसकर साहेब, दैनिक पुढारीचे संपादक शशिकांत सावंत साहेब, खालापूर पोलीस निरिक्षक आणि सध्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचा कार्यभार सांभाळणे पोलीस निरिक्षक जमील शेख साहेब, खालापूरचे पोलीस निरिक्षक विश्वजित काईंगडे, पोलीस शिपाई संदिप चव्हाण सर्व पोलीस कर्मचारी यांचे सहकार्य नेहमी मिळाले.

मनोज मधुकर कळमकर

पत्ता-श्री समर्थ निवास, घर क्र. 680,

स्वामी विवेकानन्द विद्यालयाजवळ,

पोस्ट-तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड

मेल आयडी-manojkalamkar76@gmail. com

मोबाईल क्रमांक-9765899878

अर्पणपत्रिका

पोलीस खात्यात नोकरी करताना समाजाची आणि घराची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आम्हाला स्वतःच्या पायावर ऊभे करणारे माझे वडिल कै. मधुकर शंकर कळमकर यांना माझे पहिले पुस्तक अर्पण.

मनोज मधुकर कळमकर

# कथानुक्रम

सावधगिरी

हौस

मैत्री

सावज

ऐवज

बक्षीस

पुनर्भेट

मानपान

या कथासंग्रहातील कथा काही प्रमाणात वास्तवावर आधारित आहेत. परंतु यातील सर्व नावे, स्थळे, प्रसंग आणि तारखा वगैरे काल्पनिक आहेत. त्यांचे कोणत्याही जीवित वा मृत व्यक्तीशी साम्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा.

If you think people are inherently good, you get rid of the police for 24 hours – see what happens.

Sylvester Stallone

# सावधगिरी

यशचे लग्न आठवड्यावर येवून ठेपले होते. दळवींचा एकलुता एक मुलगा यश. सून घरात येणार म्हटल्यावर यशच्या आईचा उत्साह सोसायटी मधील प्रत्येकजण पाहत होता.

दळवी पतीपत्नीची धावपळ सुरू होती. तरी बरं.. हळदीपासून लग्नाचा सर्व विधी हॉलवर ठेवल्यामुळे अर्धेअधिक कामाचा भार कमी झालेला. दळवीचा मुलगा यश कंपनीत चांगल्या हुद्यावर होता. रात्रपाळी करून आल्यामुळे दमलेल्या यशने चांगली ताणून द्यायची ठरवली होती.

“बाबा आणि तू पत्रिका वाटायला जाणार आहात ना..” यशने आईला विचारले..

“आम्ही तासाभरात परत येतोच.. जवळपासच्या पत्रिका द्यायच्या राहिल्यात” असे आईने यशला उत्तर दिले.

“कंपनीत रात्रभर जागरण झालंय मला निवांत झोपायचंय..” असे यशने आईबाबाना सांगितले.

यशचं ड़ारड़ूर झोपणं आईला माहित होतं... त्यामुळे तासाभरानी परत आल्यावर यश दार उघड़ायला येईल याची खात्री नव्हती. दमलेल्या यशची झोपमोड़ करणे आईला पटत नव्हतं.

“यश.. मी दरवाजा बाहेरून लॉक करते.. तुला त्रास नको..” आईने यशला सांगून दरवाजाला बाहेरून टाळे लावले.

थकलेल्या यशने एसी सुरू केला आणि पाच मिनिटातच गाढ झोपी गेला.

कर.. कर.... करवतीने कापण्यासारख्या आवाजाने झोपमोड़ झालेला यश वैतागला. आईबाबा परत आले असतील आणि बाबांचा काहितरी उद्योग चालला असेल असे समजून यशने ड़ोक्याखालची उशी काढून कानावर घेतली. परंतु तरी सुध्दा करवतीची कर.. कर.. कानात घुसत होती. 'बाबाना पण आताच काम करायचं होतं? झोपेचं पार खोबरं केल" असं पुटपूटत वैतागलेला यश बेड़रूम मधून बाहेर आला.

बाबाना ड़ायरेक्ट बोलण्यापेक्षा आईला सांगू... म्हणून यश किचनकड़े वळला. परंतु आई किचनमध्ये नव्हती. आईबाबांच्या बेड़रूममधून करवतीची किरकिर ऐकू येत होती. यशची पावले त्यादिशेने वळली.. आणि क्षणातच यशच्या ड़ोळयावरची झापड़ उड़ाली. एक अनोळखी तरूण कपाटाजवळ ऊभा होता... हातात करवत.. फरशीवर हातोड़ा आणि बरंचस सामान अस्ताव्यस्त पड़लेलं.

आपल्या पाठीमागे कोणीतरी ऊभं आहे याची चाहूल कपाटाजवळ असलेल्या तरूणाला लागली.. त्याने मागे वळून पाहताच दारात ऊभ्या असलेल्या यशला पाहून भूत पाहिल्यासारखा त्या तरूणाचा चेहरा झाला. क्षणभर दोघांची नजरानजर झाली.. यशला काही सुचत नव्हते. त्याचक्षणी कपाट तोड़ण्याचा प्रयत्न करत असलेला चोरट्यानी जमिनीवर पड़लेला हातोड़ा उचलून यशवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हातोड्याचा फटका कसाबसा चुकवत यशने चोरट्यावर झड़प घातली. प्रतिकार होईल याची जराहि कल्पना नसलेला चोरटा यशचा प्रतिकार बघून चांगलाच गड़बड़ला. यश आणि चोरट्याची झटापट झाली. चोरटा तरूण अंगपिंड़ाने मजबूत असल्यामुळे आपल्याला आटपणार नाही याची कल्पना आलेल्या यशने बिल्ड़ींगमधील शेजाऱ्याना मदतीसाठी आरोळी ठोकली. चोर... चोर.. असा आवाज देताना यशचा चोरट्याला पकड़ून ठेवण्याचा प्रयत्न सुरू होता.

आता आपली खैर नाही... बिल्ड़ींगमधील रहिवाशी आले तर आपण पकड़ले जावून हे ओळखून चोरट्याना उरलीसुरली ताकद एकवटून यशला जोराचा हिसड़ा मारला. यश मागे भिंतीवर जावून आदळला. तेवढी संधी मिळताचा

चोरट्यानी सर्व सामान टाकून पळ काढला. स्वतःला सावरत यश कसाबसा उठला आणि चोरट्याचे मागे धावत निघाला.

"चोर.. चोर.. पकड़ा..." असा आवाज देत यश बिल्ड़ींच्या खाली आला. चोरट्याचा साथीदार बिल्ड़ींगच्या खाली मोटरसायकल टेहळणी करत ऊभा होता. साथीदाराला कोणीतरी पकड़ण्याचा प्रयत्न करतोय हे पाहून दुचाकि सोड़ून दुसऱ्या चोरट्यानीपण पळ काढला. सराईत चोरटे काही सेकंदातच दिसेनासे झाले. टोळी असणार... मागे जाण्यात काही अर्थ नाही त्यामुळे यश परत फ्लॅटमध्ये जाण्यास निघाला.

तेवढ्यात आईबाबाना कारमधून येताना पाहून यश थांबला. कारमधून उतरताना घामाघूम यशला पाहून आईला आश्चर्य वाटले..

"काय.. रे.. झोपणार होतास ना... का लग्न जवळ आलंय म्हणून झोप उड़ालेय?" आईने हसत मारलेला टोमणा आणि त्याला बाबानी दिलेली टाळी यावर यश स्तब्धच ऊभा होता.

यशला शांत पाहून आईने पून्हा यशला विचारल्यावर.. काही मिनिटापूर्वी घड़लेला प्रकार यशने आईबाबाना सांगितला. यशनी सांगितलेली हकिकत ऐकून दोघाना धक्काच बसला. घरात लग्न असल्यामुळे कपाटात लाखो रूपयाचे दागिने व रोख रक्कम आणून ठेवलेली. यशच्या बाबानी तड़क फ्लॅट गाठला. कपाट फोड़ण्यात चोरटा अयशस्वी झाला होता. दागिने, पैसा राहू दे.... साबाईमातेच्या कृपेने पोराला काही झालं नाही हे नशिब असे म्हणताना आईचे ड़ोळे भरून आले. बंद दरवाजा आड़ राहणाऱ्या शेजाऱ्याना आपल्या बिल्ड़ींगमध्ये काय प्रकार घड़लाय याची थोड़ीसुध्दा भनक नव्हती. याचा फायदा घेत चोरट्यानी दळवीच्या दरवाजाला लॉक पाहून चोरी करण्याचा प्रयत्न केला होता परंतु यशच्या सतर्कतेमुळे लाखोच्या चोरीचा ड़ाव चोरट्याच्या अंगाशी आला होता.

# हौस

शेवटचा तास संपायला पाचच मिनिटे उरली होती. मुलं दप्तर आवरून केव्हाच तयार झालेली. घंटेचा आवाज कधी एकदा कानी पड़तो आणि धूम ठोकतो या तयारीत सर्वजण होते.

कांबळे मॅड़मनी पर्समधील आरशात दोन्ही बाजूला मान वळवत चेहरा न्याहळला. मुलांच्या लक्षात येणार नाही अशा पद्धतीने पफचा हलकासा हात गालावर फिरवला. पस्तीशी ओलांड़ली तरी पूजा कांबळे मॅड़म अजून वीशीतील तरूणीला लाजवतील अशा टापटीप राहत. पती प्रकाश सुद्धा शाळेवर शिक्षक. त्यामुळे दोघांचा भरभक्कम पगार मिळायचा. कांबळे मॅड़मना दागिन्याची मोठी हौस. सर्व प्रकारचे दागिनेचे प्रकार हट्टाने बनवून घेतलेले. सहशिक्षिका मनातल्या मनात जळायच्या. शाळेत एखादा कार्यक्रम असला कि आपली दागिने घालून मिरविण्याची हौस कांबळे मॅड़म भागवून घ्यायच्या. चालती फिरती सोन्याची पेढी आली असा टोमणा मैत्रिणी मारायच्या. पण त्यातसुद्धा कांबळे मॅड़म सुख वाटायचं.

शिपायाने घंटेचा टोल दिला आणि शेवटचा टोल देईपर्यंत संपूर्ण वर्ग रिकामा झाला. पूजानी स्टाफरूम मध्ये ड़स्टर, खड़ू जमा केले आणि शाळेबाहेर पड़ल्या.

पूजा मूळची कोल्हापूरची होती. तिथल्या संस्थेत शिक्षिका म्हणून नोकरीला लागली. लग्नानंतर दोघांची बदली संस्थेने चारशे किलोमीटर दूर खानापूरला केली होती. खानापूर सारख्या ग्रामीण भागात दोघाना जुळवून घेणं

कठिण जात होतं. परंतु हळूहळू परिस्थितीशी जुळवत घेतलं. भाड्यानी राहत असलेल्या ठिकाणी घरमालकांचा चांगल्या स्वभावामुळे परकेपणा ऊरला नव्हता.

गावापासून दूर तुरळक वस्ती असलेल्या ठिकाणी प्रकाशनी खोली घेतलेली. शाळा सुटली कि पूजा नेहमी पुढे चालत यायची. पाठीमागून बाजारहाट करून प्रकाश यायचा. तो पर्यंत जेवणाच्या तयारीला सुरवात व्हायची. रात्रीचे आठ वाजताच खानापूर शांत व्हायचं. टिव्हीवर साड़ेनऊच्या बातम्या सुरू झाल्या होत्या. पूजानी दोघांचे जेवणाचे ताट वाढून आणले. गप्पा मारत जेवण होईपर्यंत साड़ेदहा वाजून गेले.

“उद्या सकाळची शाळा आहे.. भांड़ी आताच धुवून घे पूजा.. पसारा नको” असं म्हणत प्रकाश टिव्ही बघण्यात गुंग झाला. भांड़ी घासून झाल्यावर प्रकाश मदतीला येईल असे पूजा वाटले.. दोन हाका मारून सुद्धा प्रकाश जागचा हलला नाही.

शेवटी वैतागून पूजानी सर्व भांड़ी किचन ओट्यावर आणून ठेवली. बाहेर हॉलमध्ये येवून पाहते तर काय.. प्रकाश सोफ्यावर आड़वा ड़ारड़ूर झोपलेला. झोपमोड़ केलेली प्रकाश आवड़त नसे.. म्हणून मुकाट्याने पूजाने बेड़वर जावून अंग टाकले. दमलेली पूजाला काही वेळातच झोपी गेली.

धड़ाड़.. धड़ाड़... आवाजानी पूजाची झोपमोड़ झाली.. आवाज कसला तिला काहिच कळत नव्हतं. बेड़रूमची लाईट लावली.. घड्याळाकड़े नजर टाकली तर पहाटेचे सव्वातीन वाजत होते. आवाज मुख्य दरवाजातून येत होता. पूजा हॉलमध्ये आली. प्रकाशवर आवाजाचा काहिच परिणाम नव्हता. तो मस्त घोरत होता. बाहेरून दरवाजावर कोणीतरी धड़का मारत होता. पूजा घाबरली. तिने प्रकाशला जोरजोरात हलवून उठविण्यास सुरवात केली. अहो... ऊठा... कोणतरी दरवाजा ठोकतय... चारपाच वेळा हलविण्यानंतर प्रकाशची कुंभकर्णी झोप मोड़ली.

त्रासलेला प्रकाश ड़ोळे चोळत ऊठला. पूजाकड़े पाहत... “काय झालं? काय आभाळ कोसळलं” असं विचारत असतानाच दरवाजा पून्हा जोरात आदळल्याचा आवाज आला. प्रकाश सुद्धा क्षणभर गोंधळला. बाहेरची लाईट लावून खिड़कीतून नक्की काय प्रकार आहे हे पहाव म्हणून प्रकाशनी लाईटच बटण दाबलं.

परंतु बाहेर मिट्ट काळोख. अर्धवट उघड़ेल्या खिड़कितून प्रकाशनी बाहेर नजर टाकली आणि त्याला कापर भरल. बाहेर पाच ते सातजण दरोड़ेखोर हातात कुर्हाड़, काठी घेवून होते. एकजण दरवाजावर मोठाले दगड़ टाकून दरवाजा तोड़ण्याचा प्रयत्न करत होता. बाहेर दरोड़ेखोर आहेत असे प्रकाशनी सांगताच पूजाच्या पायाखालची जमीन सरकली. काय करावं.. दोघाना सुचेना... प्रकाशनी मदतीसाठी घरमालकाच्या नावानी हाका मारण्यास सुरवात केली. पूजा सुद्धा मदतीसाठी ओरड़ू लागली.

दरवाजावर धड़का वाढत होत्या. प्रकाशनी पूजाच्या मदतीने सोफा, कपाट दरवाजा जवळ सरकवले आणि स्वतः असेल नसेल तेवढी ताकद एकवटून दरवाजा दोन हातानी दाबून धरला. दोघांचं मदतीसाठी ओरड़णं सुरूच होतं..

तेवढ्यात अर्धवट उघड़लेल्या खिड़किपाशी आलेल्या दरोड़ेखोराचा आवाज आला... गुमान जवळ हाय तेवढ सोननाणं द्या... नाहीतर फूकट जीवाला मुकाल.. कोण मदतीला येणार नाय... सगळयांच्या दरवाजाला बाहेरून कड्या लावल्यात.

मदतीची आशा संपल्यामुळे पूजा आणखी घाबरली... दरवाजावर धड़का वाढत होत्या. प्रकाशचं बळ कमी पड़त होतं. कोणत्याहि क्षणी दरवाजाची कड़ी तुटेल आणी आपली खांड़ोळी होईल या भीतीने प्रकाशचे हातपाय लटपटत होते. परंतु दरोड़ेखोरानी पूजाच्या अब्रूवर घाला घातला तर.. या विचारानी प्रकाश दरवाजा थोपवून धरत होता.

पंधरा वीस मिनिटं झाली तरी दरवाजा उघड़त नाही म्हटल्यावर दरोड़ेखोरांचा पारा चढला. पून्हा खिड़कीपाशी येवून “दागिने हवाली करा... तुमच्या जीवाला धोका करणार नाही” असा दम दरोड़ेखोर देवू लागला..

दरोड़ेखोरांचा संयम सुटत होता.. पहाटे चार साढेचारला पोलीस राऊंड़ असतो याची कल्पना असल्यामुळे दरोड़ेखोर हातघाईवर आले. प्रकाशचा प्रतिकार पाहत असलेल्या पूजानी थांबा देते दागिने.. असं म्हणत पूजा आतमध्ये गेली. प्रकाशला सुद्धा तिला थांबवावंस वाटलं नाही.. कड़ी कोणत्याही क्षणी तुटणार होती. दरवाजावर बसणाऱ्या धड़का थांबल्या होत्या. तरी प्रकाश रेटून ऊभा होता हातात ड़बा घेवून आलेल्या पूजाने काही कळायच्या आतच ड़ब्याचे झाकण खोलून खिड़कीपाशी ऊभे असलेल्या दरोड़ेखोरांच्या दिशेने डबा भिरकविला. क्षणार्धात झालेल्या प्रकाराने दरोड़ेखोर गोंधळले. ड़ोळयासमोर गड़द अंधार आणि ड़ोळयाची आग होवू लागल्यामुळे चारपाच दरोड़ेखोर मागे हटले. दागिन्याच्या ड़ब्याऐवजी मसाल्याचा ड़बा पूजानी दरोड़ेखोरांवर भिरकविला होता.

झाल्याप्रकाराने गोंधळलेले दरोड़ेखोर आणखी चवताळले. दरवाजावर धड़का वाढल्या. परंतु ड़ोळयात मसाला गेल्यामुळे चारपाच साथीदार जायबंदी झालेले.. अशामध्ये पोलीस राऊंड़ झाला तर पकड़ले जाणार या भीतीने इतरानी काढता पाय घ्यायचा ठरविले.

दरोड़ा फसल्यामुळे चिड़लेल्या दरोड़ेखोरानी “परत येवू. तुम्हाला सोड़णार नाही.. खांड़ोळी करू” अशी धमकी दिली. दरोड़ेखोर नक्की परत गेलेत यावर पूजा आणि प्रकाशचा विश्वास बसत नव्हता. दोघंपण दरवाजा खेटून मदतीसाठी हाका मारत होती.

तास दोन तास गेले असतील... उजाडू लागलं.. बराच वेळ दरवाजावर धडका नव्हत्या. पूजा ऊठली.. खिडकितून बाहेर डोकावून पाहिल.. शांतता होती. मोठ्या संकटातून सुटलो याची जाणीव होताच तिला रडू कोसळलं.

आता पूर्ण ऊजाडलं होतं. बाहेर दूधवाला निलेशचा आवाज ऐकून प्रकाश ऊठला. आता भीती नव्हती. दरवाजा उघडला. दूधवाला निलेशने घरमालकाच्या दरवाजाची कडी उघडली. घरमालकिण धावतच बाहेर आली. रात्रभर सुरू असलेला दरोडेखोरांचा हैदोस त्यांच्या कानावर पडत होता. परंतु दरवाजाना कडी आणि जिवाच्या भीतीने त्यांचीपण गाळण ऊडाली होती. प्रकाश आणि पूजाला सुखरूप पाहून घरमालकिणी देवाचे आभार मानू लागली.

बाई गं.. यापुढे दागिन्याची हौस नको... डोळयावर येते.. या घरमालकिणीच्या शब्दानी पूजा शरमली. परंतु पूजानी वेळीच दाखवलेले प्रसंगावधान यामुळे आलेली वेळ टळली होती याची जाणीव झालेल्या प्रकाशने तिला जवळ घेतले. आपली हौस जिवावर बेतली होती याची आठवण होवून पूजाला रडू कोसळलं.

# मैत्री

“रात्रीच्या जेवणात काय बनवू? चिकन दुपारीच संपलंय...”

गुलाबने विचारलेला प्रश्न ऐकून सुद्धा न ऐकल्यासारखं करत काशिनाथने कूस बदलली.

“अहो लोळताय काय.. उठा.. शेताकड़े जावून चिंबोरी, मुठे मिळतेय का बघा” असा आदेशच गुलाबने काशिनाथला दिला.

दुपारी जरा ’जास्त’ झाल्यामुळे काशिनाथ सुस्तावला होता. ड़ोळे जड़ झाले होते.. पण काय करणार? बायकोची आज्ञा शिरसावंद्य मानत काशिनाथ ऊठून बसला. अंगाला आढेवेढे दिले.

“अग जरा कोरा चहा दे.. सुस्ती आलेय..”

“जरा कमी घ्यायची ना...” गुलाबने टोमणा मारला.

गुलाबच्या टोमण्याकड़े दुर्लक्ष करित काशिनाथने तांब्यातील पाण्यानी चूळ भरली आणि दारावरच्या टॉवेलने तोंड़ पुसत बाहेर नजर टाकली.

पाऊस थांबला होता. गुलाबने चहाचा कप काशिनाथच्या समोर धरला.

“जास्त वेळ लावू नका.. दोघांना पुरतील एवढेच आणा... उद्या उपवास आहे.”

चहा संपवून काशिनाथ बाहेर पड़ला. गावात हमरस्त्याला लागून काशिनाथचं शेत होतं. बाजूला सर्वत्र मुंबईवाल्यानी जागा खरेदि करून फार्महाऊस तयार केलेले. सुट्टी असली कि दिवसभर धिंगाणा चालयचा. गावापासून लांब

असल्यामुळे मुंबईवाल्याचा त्रास नव्हता. मुंबईवाले आले कि काशिनाथला सुद्धा कमाई असायची. गावठी कोंबड़ा आणून दे.. सिगारेट पाकिट आण.. असल्या कामात काशिनाथला चिरीमिरी भेटायची.

शेताच्या बांधावरून जाता जाता काशिनाथने चारपाच मुठे पकड़ून पिशवित भरले. अजून एखादी चिंबोरी भेटली तर बरे होईल असा मनात विचार करत काशिनाथ बांधावरून चालताना एकदम त्याची पावले अड़खळली. बांधाच्या टोकाला जांभळीच्या झाड़ाखाली कोणीतरी इसम पड़लाय.. कोण असेल हे बघण्यासाठी काशिनाथ जांभळीच्या दिशेने निघाला.

गवतात पड़लेल्या त्या इसमाजवळ जाताच काशिनाथची दुपारची होती नव्हती तेवढी झटकन उतरली. त्याला कापर भरल्यासारखं झालं.

"खून.. खून!!" जेमतेम दोन शब्द उच्चारत काशिनाथ पळत सुटला.

काही मिनिटातच काशिनाथच्या शेतावर खून झाल्याची वार्ता गावभर पसरली. पोलीस पाटील काही गावकरी घेवून काशिनाथच्या शेतावर पोहचले. अंदाजे तिशीचा तरूणाचा ड़ोक्यात दगड़ घालून खून करण्यात आला होता. खूनाची वार्ता पोलीस पाटलानी मोबाईलवरून इन्सपेक्टर मुंडेना कळवली. कोणाचा खून झालाय पाहण्यासाठी गावातील पोराटोरानी गर्दी केली होती.

पोलीस पाटलांच्या फोननंतर दहा मिनिटात पोलीस जीप घटनास्थळी पोहचली. इन्सपेक्टर मुंड़ेना आणि पोलीस कर्मचारी जीपमधून उतरताना पाहून गर्दी मागे हटली. पोलीस पाटील पुढे होत साहेबाना नमस्कार केला. मुंडे साहेबानी मान हलवत नमस्काराचा स्विकार केला. अंदाजे तिशीच्या आसपासचा तरूण.. अंगातील कपड्यावरून चांगल्या घरातला वाटत होता. इन्सपेक्टर मुंडेनी आजूबाजूला नजर टाकली. काही अंतरावर रक्तानी माखलेला दगड़ पड़लेला. ड़ोक्यात दगड़ घालून निर्घूणपणे खून करण्यात आला होता.

“पाटील मृतदेह ओळखीचा वाटतोय का?” मुंडे साहेबानी प्रश्न केला.

“साहेब या भागातला नाही वाटत.. मुंबईपासून लोक येतात. रात्रभर पार्ट्या चालतात.. त्यातला एखादा असेल.”

पाटलांच्या उत्तराने मुंडे साहेबांच्या कपाळावर आठी आली. मुंबईचा असेल तर ओळख पटेपर्यंत बॉड़ी सांभाळावी लागणार होती.

“कदम, पंचनामा करा.. जाबजबाब घ्या आणि बॉड़ी जावू दे पोस्टमार्टमला.”

मुंडे साहेबानी आदेश देताच कदम आणि टिम कामाला लागली. काशिनाथचा जबाब घेण्यात आला. पंचनामा आटपला होता. तेवढ्यात बॉड़ी नेण्यासाठी शववाहिका आली. शववाहिचा ड्रायव्हर अब्दुलने स्ट्रेचर गाड़ीतून बाहेर काढले. बॉड़ी उचलायला लागेल म्हणून जमा झालेली बघ्यांची गर्दी पांगापाग झाली. शेवटी हवालदार कदम, पोलीस पाटील, काशिनाथ आणि अब्दुल पूढे सरसावले. स्ट्रेचर खाली ठेवताना अब्दूलला थबकला. ओळखीचा चेहरा वाटतोय.. असं म्हणत अब्दुलने मृत तरूणाचा चेहरा न्याहाळायला सुरवात केली.

“साब... यह सापोली में रहता है! विशाल नाम है” असे अब्दुलने सांगताच इन्सपेक्टर मुंडे आणि सोबतचे पोलीस कर्मचारयांच्या सुटल्याचे भाव आले. मृतदेहाची ओळख पटली म्हणजे पुढचा बराच ताप वाचला होता.

खून झालेल्या ठिकाणापासून सापोली जेमतेम दहा किलोमीटर होतं. मुंडे साहेबानी सर्व यंत्रणा कामाला लावली. खबऱ्याना सूचना दिल्या. विशालचा खून होवून काही तासच उलटले होते त्यामुळे खूनी गाफिल असताना पकड़ायचे असा प्लान मुंडे साहेबानी आखला. विशालचा खून झाल्याची माहिती त्याच्या घरी कळविण्यात आली. विशाल राहत असलेल्या वस्तीत बातमी समजताच शेकड़ोजण

पोलीस ठाण्यात जमा झाले. विशालच्या नातेवाईकांची रड़ारड़ गोंधळ पोलीस ठाण्याच्या आवारात सुरू झाला.

विशाल अविवाहित असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर मुंडे साहेबानी तो धागा पकड़त तपास करण्याच्या सूचना हवालदार कदमना दिल्या. विशालचे मित्रमंड़ळी, पैशाचे व्यवहार याची चौकशी सुद्धा करा अशा सूचना मुंडेनी दिल्या.

तेवढ्यात मुंडे साहेबांचा मोबाईल वाजला. मुंडे साहेबांच्या विश्वासातला खबऱ्या पलीकड़ून बोलत होता.

“कदम, चला अंदाज खरा ठरतोय.. प्रेमाची भानगड़ दिसतेय” असे म्हणत मुंडे साहेब जीपच्या दिशेने निघाले.

सापोलीत विशाल राहत असलेल्या वस्तीला लागून दुसरी वस्तीजवळ जीप थांबली. रात्रीचे दहा वाजत होते. जीपमधून उतरताच खबऱ्यानी दिलेल्या माहिती प्रमाणे इन्सपेक्टर मुंडे आणि पोलीस पथक एका घरासमोर थांबले. कदमनी दरवाजाची कड़ी वाजवली. एका तरूणाने दरवाजा उघड़ला. दारात पोलीस पाहताच दरवाजा उघड़णारा तरूण एकदम चपापला. दिलीप कोण आहे.. असा कदम यानी प्रश्न विचारताच.. तरूणाने खाली मान घातली.

तेवढ्यात दिलीप गाड़ी आली का असं विचारत हातात बॅग घेवून आणखी एक तरूण आतल्या खोलीतून बाहेर आला. दारात ऊभ्या पोलीसाना पाहून त्याच्या हातातली बॅग गळून पड़ली. दिलीप आणि त्याचा मित्र रात्री च शिर्डीला जाण्याच्या तयारीत होते. पोलीसानी जीपमध्ये बसा सांगताच कोणतेही आढेवेढे न घेता दोघं जीपमध्ये बसले.

विशालच्या मृतदेहाचे पोस्टमार्टम करून बॉड़ी ताब्यात दिल्यामुळे पोलीस ठाण्यातील विशालच्या नातेवाईक माघारी वस्तीवर गेले होते. दिलीप

आणि दिनेशला घेवून जीप पोलीस ठाण्यात पोह्चली. मुंडे साहेबानी दोघाकड़े चौकशीला सुरवात केली.

“विशालचा खून का केलात? जिवलग मित्र होता ना तुमचा.... का मारलत..?” मुंडे साहेबानी प्रश्न विचारताच दिलीप आणि दिनेश खाली मान घालून बसले होते.

“अरे तुम्हीच खून केलाना...?”

मुंड़े साहेबानी पुन्हा जोर देवून विचारताच दिलीप बोलू लागला.

“साहेब एका ताटात जेवायचो विशाल आणि मी. पण खाल्या ताटात घाण केली म्हणून काटा काढला त्याचा.”

“साहेब दिलीपची बहिण हेमा बरोबर विशालने सूत जमवलं होतं.. एकदा सांगून सुद्धा सुधारला नाही.. त्यातच हेमाला दिवस गेले वस्तीत तोंड़ दाखवायला जागा नाही म्हणून पार्टीच्या बहाण्याने विशालला बाहेर नेला दारू पाजल्यानंतर आधी गळा आवळला नंतर ड़ोक्यात दगड़ घातला” असे निर्विकार चेहऱ्याने दिनेश सांगत होता.

काही तासातच खून प्रकरणातले दोन आरोपी पोलीसांच्या ताब्यात आले होते. मैत्रीला कलंक लावणारा विशाल जिवानिशी गेला होता पण जाताना तिघांच्या आयुष्याची राखरांगोळी करून गेला होता.

# सावज

दिपाची सकाळपासून कामाची धावपळ सुरू असायची. मुलं शाळेत जाई पर्यंत पायाला भिंगरी असल्यासारखं दिपाला इकडून तिकडे सारं घर फिराव लागत असे.

दिपाचं चार जणांचं छोटं कूटूंब. नवरा सुनील स्टिल कंपनीत कामगार. जेमतेम पगार मिळायचा. त्यामुळे सुनीलची ओव्हरटाईम करून घरखर्च भागविण्याची धडपड असायची. सुनील बघावं तेव्हा कंपनीत. त्यामुळे मुलं शाळेत गेली का दिपाला घर खायला ऊठायचं. पार्लरचा कोर्स लावावा म्हणजे वेळपण जाईल आणि कोर्स पूर्ण झाला कि पार्लर सुरू करता येईल असा विचार बरेच दिवस दिपाच्या मनात सुरू होता. दिपाची स्वप्नं सुद्धा मोठी होती. स्वतःचा ऐसपैस बंगला, गाड़ी, दागिने... पण सुनिलच्या पगारात कसं झेपणार या विचारानी मनात हवेत ऊडणारं विमान पुन्हा जमीनीवर यायचं.

थोड़ा निवांत वेळ मिळाल्यामुळे दिपा बेड़वर आड़वी झाली. टिव्हीवर एखादा चांगला पिक्चर आहे का बघण्यासाठी दिपा रिमोटने चॅनलने बदलत होती. चॅनेल बदलताना एका भोजपूरी चॅनेलवर सुरू असलेली जाहिरात पाहून दिपा ऊठून बसली. स्क्रीनवर दाखविण्यात येणारा फोटोतील हिरो ओळखा आणि टाटा सफारी गाड़ी जिंका. हिंदी चित्रपटात काम करणारा आघाड़ीचा हिरो आहे.. तुम्ही फोटोतील चेहरा ओळखला असल्यास टिव्ही स्क्रीनवर दाखवत असलेल्या क्रमांकावर कॉल करा किंवा मेसेज करा. किती सोप्पं आहे.. हा तर आमीर खानचा

फोटो आहे असे म्हणत दिपाने टिव्हीचा आवाज वाढविला. काही मिनिटं शिल्लक आहेत... फोटो ओळखा आणि टाटा सफारी जिंका असा जाहिरातीमधील अँकर ओरड़ून सांगत होता.

दिपाला राहवलं नाही.. तिने मोबाईल हातात घेतला आणि टिव्ही स्क्रीनवर दाखविलेला नंबर ड़ायल केला. सेंकदात फोन लागला. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने दिपाला पूर्ण नाव व पत्ता विचारल्यानंतर प्रश्नाचं ऊत्तर देण्यासाठी फोन अँकर बरोबर जोड़ून दिला.

“दिपाजी अगर आपने फोटो सही पहचानी है तो ऊत्तर बताईए...” असं अँकरनी विचारताच दिपाने “आमिर खान” असं उत्तर दिलं.

“बधाई हो दिपाजी आपका ऊत्तर सही है.. आप ने जीती है टाटा सफारी गाड़ी...” असं समोरचा अँकर सांगतोय यावर दिपाचा क्षणभर विश्वासच बसत नव्हता.. तिने स्वतःला चिमटा काढला.. खरंच मला टाटा सफारी गाड़ी बक्षीस मिळाली.. समोरून फोनवरून दिपाला लवकरच तुमची गाड़ी तुमच्या दारात असेल असं सांगून फोन कट झाला.

दिपाला आपण स्वप्नात तर नाही ना असं वाटू लागलं. कधी एकदा मूलं आणि नवरा सुनील घरी येतोय आणि त्याना हि खूषखबर सांगतेय असं दिपाला झालं होतं.

तेवढ्यात दिपाच्या मोबाईलवर देखील टाटा सफारी गाड़ी जिंकल्याचा मेसेज आला. मेसेज वाचून दिपानी आनंदात बेड़वरून ऊड़ीच मारली. मुलं शाळेतनं घरी आल्या आल्या दिपाने दोघानाही लवकर आपली फोरव्हिलर येणार असल्याचे सांगताच दोघंही ऊड्या मारू लागली. सुनीलचा फोन आला.. नेहमीप्रमाणे ओव्हरटाईमासाठी थांबणार असल्याचे त्यानी सांगितले. सुनीलला आताच खुषखबर सांगून टाकावी असा विचार करून दिपा तिच्या पराक्रमाची कॅसेट

सुनीलला ऐकवली. मोबाईलवरून ऊत्तर देवून टाटा सफारी गाड़ी बायकोनी जिंकली हे ऐकून सुनीलपण खुष झाला.

दुसऱ्या दिवशी दिपाच्या मोबाईलवर मेसेज आला. त्यामध्ये टाटा सफारी गाड़ी तुमच्या नावे करण्यासाठी तसेच इतर प्रोसिजरचा खर्च म्हणून पन्नास हजार रूपये भरावे लागतील. मेसेजमध्ये बँक खाते क्रमांक दिला होता. पन्नास हजार एवढी रक्कम कूठून आणायची. दिपाने कालच्या नंबरवर पुन्हा फोन लावला. समोरून फोन उचलताच.. दिपाने बोलायला सुरवात केली.. “बरोबर ऊत्तर दिलं त्यावेळी तुम्ही पन्नास हजार रूपये भरावे लागतील असं काही सांगितलं नाही. आणि आता एवढे पैसे कूठून आणणार?” दिपाच्या प्रश्नावर समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने सहमती दर्शविली. ऊत्तर विचारताना या तांत्रिक बाबी सांगितल्या जात नाहीत.. तसेच बारा लाखाची गाड़ी किंवा त्याबदल्यात तेवढ्याच रकमेचा चेक सुद्धा मिळू शकेल असे समोरची व्यक्ती सांगत होती.

“काही दिवसाचा अवधी द्या” असे सांगत दिपाने फोन कट केला. बारा लाखाची गाड़ी किंवा तेवढीच रक्कम केवळ पन्नास हजारात मिळणार असेल तर काय हरकत आहे.. पण एवढ्या रकमेची जमवाजमव कशी करणार असा विचार करत दिपा बसली होती. सुनील कामावरून आल्यावर दिपाचा चिंताग्रस्त चेहरा पाहून त्याने दिपाकड़े विचारणा केली. दिपानी फोनवर झालेल सर्व बोलणं आणि मोबाईलवरचा मेसेज सुनीलला दाखवला. जवळ शिल्लक तर काहिच नव्हती त्यामुळे काहिच मार्ग दिसत नव्हता.

“अहो भीशी आहे ना वीस हजाराची!” दिपाला एकदम आठवलं. सुशीलाबाईना सांगून या महिन्याची भीशी घेते.

“आणि ऊरलेले तीस हजाराच काय करायचं?” सुनीलने प्रश्न केला.

"अहो महिनाभरा करता मंगळसूत्र आणि कानातले ठेवू पेढीवर आणि पैसे आले कि सोड़वून आणू." दिपाचं बोलणं सुनीलला पटल्यासारखं वाटलं त्याने होकारअर्थी मान हलवली.

दिपाने चार दिवसात पैशाची जमवाजमव केली. मोबाईलवर आलेल्या मेसेजमधील बँक खात्यावर तिने पन्नास हजार रूपये भरले. पैसे भरल्याची पावती पर्समध्ये ठेवत दिपाने बँकेतूनच फोन लावला. तुम्ही सांगितल्याप्रमाणे पन्नास हजार खात्यात जमा केलेत मला गाड़ीच्या बदल्यात बारा लाखाचा चेक पाहिजे असे दिपाने सांगितले. पलीकड़ून फोनवर बोलणाऱ्या व्यक्तिने दिपाचे अभिनंदन करून तिचा खाते क्रमांक लिहून घेत आठवड्यात पैसे जमा होतील अशी माहिती दिली.

आठवड़ा ऊलटून गेला तरी खात्यात काहिच रक्कम जमा झाली नव्हती. दिपाने दोन वेळा बँकेत चक्कर मारली. दोन्ही वेळेला तेच उत्तर. शेवटी दिपानी फोन लावून चौकशी करावी म्हणून मोबाईलवरून फोन लावला. परंतु काही केल्या फोन लागेना. तीन चारवेळा प्रयत्न करून फोन लागला नाही तसं दिपाला टेन्शन आलं. कसंबसं घर गाठल. सुनील नाईट करून झोपला होता. त्याची झोपमोड़ करण दिपाला योग्य वाटलं नाही. परत एकदा फोन लावून बघावा असा विचार करून दिपाने मोबाईलवरून फोन लावण्याचा प्रयत्न केला. या क्रमाकांची सेवा खंड़ीत करण्यात आली आहे ऐकून दिपाच टेन्शन अजून वाढलं.

शेवटी न राहवून तिने सुनीलला ऊठविले.

"अहो.. जरा ऐकताय का?"

कंपनीत जागरण झाल्यामुळे सुनील गाढ झोपला होता. दिपाचा आवाज त्याच्या कानापर्यंत पोहचत नव्हता. दिपानी सुनीलला जोरजोरात हलवायला सुरवात केली. तशी सुनीलची झोपमोड़ झाली.

"अग काय आभाळ कोसळलय? धड़ झोपून पण देत नाय" असे बोलत वैतागत सुनील ऊठून बसला.

दिपाचा काळवंड़लेला चेहरा पाहून सुनील अस्वस्थ झाला. दिपानी सुनीलला अद्याप पैसे जमा झाले नाहीत शिवाय नंबरपण बंद येतोय असे सांगितले. दिपाच्या बोलण्यानी सुनीलची झोपच ऊड़ाली. पन्नास हजाराची रक्कम त्यांच्या करिता वर्षभराची कमाई होती. "पुन्हा एकदा बघ फोन लावून बघ" असे सुनीलने सांगताच भाबड्या आशेने दिपा नंबर ड़ायल केला. परंतु पुन्हा पलीकड़ून काहिच प्रतिसाद नाही.

"पन्नास हजार भरल्याची पावती आहे. असे सोड़ायचे नाही पोलीसात कंप्लेट देवू" असे दिपा बोलत होती परंतु सुनील मात्र ड़ोक्याला हात लावून बसलेला.

दिपानी पर्समधली पैसे जमा केल्याची पावती तपासली आणि सुनीलला घेवून पोलीस ठाणे गाठले. ठाणे अंमलदार यशवंत भोईर खुर्चीत रेलून मोबाईलवर निवांत बोलत बसलेले. दिपा आणि सुनीलला पाहून समोरच्या बाकड्यावर बसण्याचा इशारा भोईरने केला.

मोबाईलवरच बोलणं आटपल्यावर "हां बोला काय तक्रार आहे?" असे भोईरनी विचारताच दिपानी सुरवातीपासून सर्व हकिगत अंमलदार भोईरला सांगत पर्समधील बँकेची पावती काढून समोर ठेवली.

"अहो बाई तुम्ही सुशिक्षित लोक अशा फसव्या जाहिरातीना कसे बळी पड़ता" असे बोलत भोईरने पावतीवरिल खातेक्रमांकावर नजर टाकली. पोलीसाच्या अशा बोलण्यानी सुनील आणि दिपाचे हातपाय गळाले. तुमची तक्रार लिहून घेतो. बघू काय तपास लागतो असे म्हणून भोईरने दिपाची तक्रार लिहून घेतली. जड़ पावलानी दिपा आणि सुनील पोलीस ठाण्यातून घरी परतले.

अशा गुन्ह्याचा तपास लावण्यात हातखंडा असलेला पोलीस हवालदार महेश करमरकर कड़े गुन्ह्याचा तपास सोपविण्यात आला. हवालदार करमरकरने दिपानी पैसे भरलेले बँक खाते बिहार राज्यातील राजू नावाच्या व्यक्तीचे असल्याची माहिती मिळवली. राजूचा शोध घ्यायचा असेल तर बँकेतून त्याचा पत्ता मिळविणे गरजेच होतं त्यासाठी बिहार गाठणे आवश्यक होतं. इन्सपेक्टर पाटील यांची परवानगी घेत महेश करमरकर आणि संदिप चव्हाण तपासाकरिता बिहारला रवाना झाले. बँकेतून राजूचा पत्ता मिळवित करमरकर आणि संदिप चव्हाण यानी स्थानिक बिहार पोलीसांच्या मदतीने रातोरात राजूच घर गाठल.

राजूला ताब्यात घेवून त्याची चौकशी केली असता आकाश नावाच्या तरूणानी राजूला हजार रूपये देवून त्याच्या नावाच बँकेत खातं ऊघड़ल होतं. तसेच खात्यावरिल सर्व व्यवहार आकाशच बघत असल्याची माहिती दिली. राजू केवळ मोहरा असल्याचे तपासत समोर येत होते. खरा सूत्रधार आकाश होता.

आता पोलीसाना आकाश पर्यंत पोहचायचं होतं. राजूने दिलेल्या माहितीनुसार आकाश कॉलेज युवक होता. परंतु नक्की कोणत्या कॉलेजमध्ये शिकतोय याची माहिती राजूला नव्हती. हवालदार महेश करमरकर हार मानणाऱ्यापैकी नव्हता. त्यानी आकाशचा गावाचा पत्ता शोधला. परंतु बिहारमधील मागासलेल खेड़ं. गावात जायला रस्ता नाही अशाही परिस्थितीत हवालदार करमरकर आणि संदिप चव्हाण यानी आकाशचं गाव गाठायचा निर्णय घेतला.

बिहारच्या स्थानिक पोलीसानी गावात जावू नका गावकरी पोलीसांवर हल्ला करतात अशी माहिती दिली. तरी सुद्धा खाजगी वेषात महेश करमरकर आणि संदिप चव्हाण यानी आकाशचं गाव गाठलं. आकाशची चौकशी करत असताना काही मिनिटातच शेकड़ो गावकरी जमले. दोघांचा रस्ता अड़वला होता. त्याहि अवस्थेत करमरकर आणि चव्हाण यानी आकाशचं घर गाठलं.

आकाश संधीचा फायदा घेत पसार झाला होता. घरी आकाशची म्हातारी आई होती. पोरगा काय दिवे लावतोय याची म्हातारीला सुध्दा कल्पना नव्हती. आकाश हाती लागला नाही तरी आकाशच्या नावाच वॉरंट बजावून रायगड़ पोलीस सहिसलामत बिहारमधील खतरनाक गावातून बाहेर पड़ले.

जाहिरातीमधून फसवणूक करणारे एक मोठ रॅकेट बिहारमध्ये कार्यरत असून आकाश त्या साखळीचा एक भाग असल्याची महत्वाची माहिती हवालदार महेश करमरकर यांच्या हाती लागली होती. या रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी स्थानिक बिहारी पोलीसांची हवी तशी मदत न मिळाल्यामुळे दिपा आणि सुनील सारख्याना हजारो रूपयाना गंड़ा घालणारी टोळी अद्याप मोकाट सावज शोधत फिरत आहे.

# ऐवज

साड़ेसात वाजले तशी हेमाची चुळबुळ वाढली. घरी जायची वेळ झाली होती पण दुकानातील गिऱ्हाईक काय कमी व्हायचे नाव घेत नव्हते.

हेमा इलेक्ट्रॉनिक दुकानात कामाला होती. दिसायला सुंदर आणि बोलण्यात पटाईत. हेमा आलेलं गिऱ्हाईक रिकाम्या हाताने पाठवायची नाही. त्यामुळे मालकाचा विश्वासदेखील हेमानी संपादन केलेला. दिवाळी तोंड़ावर आलेली त्यामुळे गिऱ्हाईकाची वर्दळ सुरूच होती. घरी जायला ऊशीर होतोय.. पायी चालत एकटी जायचं.. रात्री आठ नंतर रस्त्याला फारस कोणी नसत त्यामुळे हेमाची सारखी नजर पुढे सरकणाऱ्या घड्याळाच्या काट्याकड़े लागलेली.

दुकानाचे मालक जयेशशेठच्या लक्षात हेमाची घालमेल लक्षात आली. कांऊटर सोड़ून जयेशशेठ हेमा जवळ आले. हेमा ऊशीर झाला असेल तर गाड़ीनी सोड़ायची व्यवस्था करतो.. शेठच बोलणे ऐकून हेमाला हायसं वाटलं.. घरी जायची परवानगी तर मिळाली.

“नको शेठ नेहमीची वेळ झालेय मी जाईन” असे म्हणत झटपट पर्स उचलत हेमा दुकानांच्या बाहेर पड़ली. मोबाईलमध्ये येड़ लागलंय गाण सुरू करून दोन्ही कानात हेड़फोन घालत हेमानी झपाझप पावलं उचलायला सुरवात केली. वाटेत चंदरआदिवासी वाड़ी लागायची. वाड़ीतील खांबावरिल बल्बचा ऊजेड़ सोड़ला तर संपूर्ण रस्ता काळोखात हरवलेला. नेहमीचा रस्ता असल्यामुळे हेमाला रस्त्यावरचे सर्व खाचखळगे पाठ होते. दोन अवघड़ वळण सोड़ले का गाव येणार होतं.

तेवढ्यात पाठीमागून कोणीतरी हेमाची तोंड घट्ट दाबलं. आणि तिला रस्त्याच्या कड़ेला गवतात ओढण्यास सुरवात केली. अचानक झालेल्या प्रकाराने हेमा गांगरली. पुरूषी हाताची पकड़ हेमाच्या शरिराभोवती पड़ली होती. पुढे आपल्याबाबतीत काय घड़णार यांचा अंदाज आलेल्या हेमानी शरिरात असेल नसेल तेवढी ताकद एकवटत जोराचा हिसड़ा मारला. हेमाच्या अनपेक्षित प्रतिकारामुळे पुरषी पकड़ ढिली पड़ली.

तीच वेळ साधत हेमानी मदती करिता आरड़ाओरड़ करण्यात सुरवात केली. आता आपली खैर नाही हे ओळखून हेमावर अतिप्रसंग करण्याच्या इराद्याने आलेला तरूण अंधारात ऊलट्या दिशेने पळू लागला. तेवढ्यात दुरून गाड़ीचा हेड़लाईटचा ऊजेड़ दिसल्यामुळे हेमाच्या जीवात जीव आला. तीने सुद्धा काळोखात पळणाऱ्या तरूणाचा पाठलाग सुरू केला. पळतापळता पायाला ठेच लागल्यामुळे तोंड़ावर आपटलेल्या तरूण रस्त्यावरच आड़वा झाला. समोरून येणारी दुचाकी पाहून हेमाची ड़ेअरींग वाढली. ती झटकन खाली पड़लेल्या तरूणापाशी पोह्चली.

तरूणाला पाहून हेमा चमकली. हा तर चंदरवाड़ीतला कैलास. नेह्मी येता जाता चंदरवाड़ीजवळ बसलेला हेमाला दिसायचा. कधीकधी शेठच्या दुकानात साफसफाई करायला यायचा. कैलासला पाहून राग अनावर झालेल्या हेमानी पायातली चप्पल काढून हेमानी त्याला मारायला सुरवात केली. जवळ येणारी मोटारसायकल पाहून कैलासने एक जोराचा हिसड़ा मारत गवतात ऊड़ी मारली. पुरूषभर उंचीच्या गवतात कैलास दिसेनासा झाला. तोपर्यंत मोटारसायकल येवून हेमाच्या जवळ थांबली. गावातला पांड़ूरंग होता. हेमाचा अवतार पाहून पांड़ूरंग गड़बड़ला.

“काय ग हे? काय झालं तुझे कपड़े का माखलेत?”

हेमानी एका दमात थोड्यावेळा पूर्वी घडलेला सर्व प्रकार पांडूला सांगितला. पांडूचा विश्वासच बसेना. कैलास असे काहीतरी करेल असे त्याला वाटेना. परंतु समोर हेमा सांगतेय म्हणजे नक्कीच खरं असणार..

“पांडू, समोरच्या गवतात लपलाय कैलास” असे हेमानी सांगताच पांडूनी गाडी स्टँण्डला लावली. पण काळाकुट्ट अंधार आणि वाढलेलं गवत यामुळे कैलास सापडणं मुश्किल होतं.

“गावात जावू मदतीकरिता पोरांनाच बोलावू तु बस गाडीवर” असे पांडूनी हेमाला सांगितले. गाडीवर बसताना हेमाचा हाथ गळ्यापाशी गेला आणि तिला झटकन जाणवेल. गळा भुंडा आहे. गळ्यात सोन्याची चेन नाही. बहुतेक झटापटीत कैलासने चेनवर हाथसे साफ केला.

“पांडू दादा मला आधी पोलीस ठाण्यात सोड मग गावात जा” असे म्हणत हेमानी पोलीस ठाण्यात गाडी घ्यायला लावली.

निवांत खुर्चीत रेलून बसलेले अंमलदार बोराटे हेमाला येत असलेली पाहून आणि तिचा अवतार पाहून सावरून बसले. साहेब पटकन माझ्या बरोबर चला.. असे बोराटेना सांगत भड़ाभड़ा हेमानी तिच्यावर गुदरलेला प्रसंग ऐकवला. प्रकार गंभीर होता.. बोराटेनी ताबड़तोब गायकवाड़ आणि चव्हाण यांना सोबत घेतले. पोलीस जीप हेमानी दाखविलेल्या वाटेनी धावू लागली.

इकड़े पांडू गावात पोहचला होता. हेमाच्या बाबतीत घड़लेला प्रसंग ऐकताच गावकरी भड़कले. हातात मिळेल ती काठी टिपरा घेवून चंदरवाड़ीत निघाले.

कैलास पळालेली जागा हेमा दाखवत होती. पोलीसानी टॉर्चच्या ऊजेड़ात गवतातून चालवण्यास सुरवात केली. साहेब हा रस्ता पुढे नदिकड़े जातो एवढ्याला तो नदिपार गेला असेल अशी शंका पोलीस शिपाई गायकवाड़ने व्यक्त केली. बघूया

गवतात लपला असेल तर नाहीतर नदिपलीकड़े जावू असे म्हणत बोराटे पूढे चालत राहिले. हेमा जीपमध्ये बसून होती.

पंधरावीस मिनिटे शोधाशोध करून पोलीस रिकाम्या हाताने परतले. चला पोलीस ठाण्यात जावू या.. लेखी तक्रार घेवू मग पुढची कारवाई करू असे म्हणत जीपने यु टर्न घेतला.

पोलीस जीप चंदरवाड़ी जवळ पोहचते नाही तोच हाणा मारा असा जोराचा गलका ऐकू आला. एक तरूण जीव मुठीत धरून लंगड़त पुढे पळतोय आणि पाठीमागून हातात काठी घेवून जमाव त्याच्या अंगावर चाल करित होता. धावता धावता तो तरूण जीपच्या समोर आला.

साहेब हाच तो कैलास.. पकड़ा असे जीपमधूनच हेमा ओरड़ली. तशी चव्हाणने गाड़ीतून ऊड़ी मारत कैलासची बखोटी पकड़ली. तेवढ्यात गावकरी आले. साहेब आमच्या हवाली करा आम्ही जितका सोड़णार नाय. संतापलेले गावकरी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. बोराटे जीपमधून खाली ऊतरले. कायदा हातात घेवू नका त्याला योग्य ती शिक्षा मिळेल.

हेमा देखील जीपमधून उतरली. तिला सुखरूप पाहताच तिच्या आईशी कड़कड़ून मिठी मारली. हेमानी गावकऱ्यांची समजूत काढत सर्वांना माघारी पाठवलं. पांड़ू आणि हेमा आणि तिची आई पोलीस ठाण्यात तक्रार द्यायला आले.

कैलास गुढघ्यात मान टाकून बसलेला. पोलीस शिपाई गायकवाड़ने कैलासचे केस पकड़ून मान वर केली तशी दारूच्या भपकारा आला. अवार्च्य भाषेत शिविगाळ करत गायकवाड़ने कैलासला बुटाने मारायला सुरवात केली. “आयाबहिणींची इज्जत काय रस्त्यावर पडलेय का” असे म्हणत गायकवाड़ कैलासवर तुटून पड़ला.

तसा मार असह्य झालेला कैलास दोन्ही हात जोड़त “सायेब, इज्जतीला हात नव्हतो टाकणार..” असे म्हणत “मारू नका” अशी विनवनी करू लागला.

“ इज्जतीला हात नव्हतो टाकणार मग काय गवतात नेऊन पूजा करणार होता काय रे...” सणसणीत शिवी देत गायकवाड़ पुन्हा कैलासच्या पेकाटात लाथ घातली.

तसा कळवळत “पोरांची शप्पथ! इज्जत नव्हतो लुटणार” असे कैलास जीव तोड़ून सांगु लागला.

“सांग मग काय करणार होतास” असे बोराटेनी विचारताच कैलास बोलू लागला...

“सायेब, रात्री हेमा रस्त्याने एकटी जाते माहित होतं. तिच्याकड़े महागातला मोबाईल असतो. कानाला लावून गाणी ऐकत जाते. गळयात सोन्याची चेन. नाय म्हटल तर तरी चाळीस पन्नास हजाराचा ऐवज हेमाकड़े. म्हणून पाळत ठेवून होतो. मोबाईल आणि चेन हाताला लागली तर यंदाची दिवाळी जोरात करता येईल असे ठरवलं होतं.”

कैलासचं बोलणं ऐकून बोराटेनी कपाळावर हात मारत आता दिवाळी साजरी कर बिना भाड्याच्या खोलीत असे म्हणत कैलासची रवानगी कोठड़ीत केली.

# बक्षीस

मोबाईलवर आलेली मेल वाचताच सोमनाथ बसल्या जागीच ऊड़ाला. तीन तीन वेळा मेल वाचून सुद्धा सोमनाथचं समाधान होत नव्हतं.. आनंदाने वेड़ा झालेला सोमनाथला नाचताना पाहून त्याची बायको मीना किचनमधून बाहेर आली.

“अहो असं काय करताय.. हे वय काय का तुमचं नाचण्याचं... वेड़बिड़ लागलाय का तुम्हाला?”

“हो वेड़ लागलंय.. आणि तुला सुद्धा लागेल” असं म्हणत सोमनाथने मोबाईल मीनाच्या समोर धरला. मीनाला काहीच कळेना. अहो मोबाईल काय दाखवताय. मला नीट समजेल असं सांगा.

“अग बक्षीस लागलंय.. पाच लाख पौंड़ाच.. आपण अब्जोपती झालोय... अब्जोपती!” आपला पती बहुतेक खरंच वेड़ा झालाय असं मीनाला मनातून वाटलं.

चार महिन्यापूर्वी नोकरी सुटलेली. कंपनीने चोरीच्या प्रकरणात गुंतवून सोमनाथला बाहेरचा रस्ता दाखविल्यानंतर सोमनाथ थोड़ासा सैरभैर झालेला. दोन मुलांचे शिक्षण आणि संसार कसा चालवयाचा या विवंचनेत मीना असायची. सोमनाथ कंपनीची नोकरी सुटल्यापासून घरीच बसून त्यामुळे बिचारी मीनाची ओढाताण व्हायची. त्यातच आता नवरा अब्जोपती झालोय सांगून नाचतोय बोलल्यावर तिला वेड़ लागायची पाळी आली. सोमनाथला पाण्याचा ग्लास आणून देत “नीट समजेल असं सांगा” असं म्हणून मीनाने त्याला सोफ्यावर बसविले.

अमेरीकन कंपनीने माझ्या मोबाईल नंबरची निवड़ केली असून आपल्याला पाच लाख पौड़ांच बक्षीस लागल्याचा मेल पाठवलाय असे सोमनाथ सांगत होता. परंतु मीनाच्या काय पचनी पड़त नव्हता. आपला नवऱ्याने एवढा काय पराक्रम केलाय कि त्याला बसल्या जागी अमेरिकन कंपनीने एवढं बक्षिस दिलंय याचा विचार करत मीना किचन मध्ये गेली. तिच्या पाठोपाठ सोमनाथ किचनमध्ये आला. तिला मिठीत घेत.. “अग राणी खरंच बक्षीस लागलंय... आता दारात गाड़ी, तुला दागिने नुसतीच मौजमजा करायची.”

सोमनाथची मिठी सोड़वत त्याच्या आनंदावर विरजण नको म्हणून मीना शांत राहिली. सोमनाथने मेलवर आलेल्या माहितीप्रमाणे कागदपत्राची जुळवाजुळव करण्यास सुरवात केली. अमेरिकन कंपनीने दिल्लीतील बँक शाखेचा खाते क्रमांक देवून त्यावर अड़ीच हजार रूपये भरण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे अड़ीच हजार रूपये सोमनाथने जमा केले. अमेरिकन कंपनीने तात्काळ पैसे खात्यात जमा झाले असून बक्षीसाची रक्कम तुमच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे असा मेलवर संदेश पाठविला. आता फक्त काही तासातच आपण अब्जोपती होणार या आनंदात सोमनाथ घरी आला.

अड़ीच हजार भरून चार दिवस झाले तरी सुद्धा आपल्या खात्यात पैसे जमा झाले याचा विचार करत असताना सोमनाथच्या मोबाईलवर पुन्हा एक मेल आला. काही तांत्रिक गोष्टीची पूर्तता बाकी असून रक्कम मोठी असल्यामुळे एकाच वेळी सर्व रक्कम तुमच्या खात्यात जमा करता येणार नाही. पाच टप्प्यात रक्कम जमा करावी लागणार असून कंपनीच्या खात्यात लाख रूपये भरावे लागतील असा मेलवरून संदेश अमेरिकन कंपनीकड़ून आला होता.

सोमनाथ विचारात पड़ला एवढे पैसे आणायचे कूठून? पण बक्षीसाची रक्कम मोठी आहे.. हातची घालवून उपयोग नाही. यावर उपाय काय विचार करत असताना सोमनाथला मीनाची आठवण झाली. मीनाला लाड़ीगोड़ी लावत

“बक्षिसाची रक्कम मिळाली कि तुला पंचवीस तोळयाच मंगळसूत्र करिन पण यावेळेस मदत कर.” नवऱ्याच्या हट्टापुढे बिचाऱ्या मीनाच काहिच चालेना. मीनाच मंगळसूत्र गहाण ठेवून सोमनाथने लाख रूपये जमा केले.

यावेळी अमेरिकन कंपनीने खाते क्रमांक बदलून दिला होता. लाख रूपये सोमनाथने कंपनीच्या खात्यात भरल्यानंतर सोमनाथच्या मोबाईलवर पुन्हा अभिनंदनाचा संदेश आला. कंपनीच्या संचालकानी सोमनाथला मेल पाठवून बक्षिसाची रक्कम लवकरच तुमच्या खात्यात जमा होईल याची हमी दिली होती.

सोमनाथ दररोज एटीएममध्ये जावून खात्यावरचा बॅलन्स तपासत होता. पण एक रूपयाची वाढ होत नव्हती. महिना उलटत आला तरी बक्षीसाची रक्कम जमा होत नसल्यामुळे सोमनाथने कंपनीच्या संचालकाना मेल पाठवून विचारणा केली. त्यानंतर काही मिनिटातच सोमनाथला कंपनीच्या मेलवरून संदेश आला. भारतीय रकमेनुसार बक्षीस करोड़ाच्या घरात असून त्यावरिल कर, इतर बाबीची पूर्तता करण्यासाठी पाच लाख रूपये भरावे लागतील.

कंपनीकड़ून आलेला संदेश वाचून सोमनाथ विचारात पड़ला. पाच लाख रक्कम आणणार कूठून? बक्षीस तर हातातून घालवायचे नव्हते. रात्रभर या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत सोमनाथ विचार करत होता. सोमनाथची अवस्था पाहून न राहवून मीना ऊठली. “अहो जावू द्या पाच लाख पौंड़.. आहे त्यात सुखी आहे मी. तुम्ही नाद सोड़ा बक्षीसाचं..” पण अब्जोपती होणार या नादाने पछाड़लेला सोमनाथने मीनाला दटावत.. “तू झोप. माझं मी बघून घेईन” सांगताच बिचारी एका तोंड़ फिरवून झोपी गेली.

सकाळी उठताच सोमनाथने कपाटात शोधाशोध सुरू केली. आहो काय शोधताय? मीनाचा आवाज ऐकून सोमनाथ गड़बड़ला.

“काही नाही.. जमिनीचे कागदपत्राची फाईल शोधतोय.”

बक्षीसासाठी सैरभैर नवरा आता जमिनपण विकणार या विचाराने मीनाच टेन्शन वाढलं.

“अहो तेवढीच काय ती शेतजमीन शिल्लक आहे.. ती तरी राहू द्या” असे मीनाने सांगताच सोमनाथ भड़कला.

“माझी जमिन आहे वाटेल ते करिन” असे म्हणत दोघांमध्ये कड़ाक्याचं भांड़ण झालं. रागाच्या भरात सोमनाथने मीनाच्या अंगावर हात ऊगारला.

सोमनाथचा अवतार पाहून मीनाने माघार घेतली.

खटपटी करून सोमनाथने शेती विकली. पाच लाखाची सोय झालेय असा मेल सोमनाथने कंपनीच्या संचालकाना पाठविल्यानंतर पुन्हा नवीन खाते क्रमांक कंपनीकड़ून सोमनाथला देण्यात आला. सोमनाथने पाच लाख भरल्यानंतर पुन्हा कंपनीच्या संचालकानी सोमनाथचे अभिनंदन करणारा मेसेज पाठवत आठवड़ाभरात बक्षीसाची रक्कम खात्यावर जमा होईल याचे आश्वासन दिले.

आठवड़ा होवून गेला तरी अमेरिकन कंपनीकड़ून काहिच संदेश नाही. आणखी थोड़ी वाट पाहू अशी स्वतःची समजूत घालत सोमनाथने महिना घालवला.

शेवटी पुन्हा कंपनीच्या मेलवर सोमनाथने बक्षीसाची रक्कम अद्याप जमा झाली नसल्याचा संदेश पाठविला. यावेळी कंपनीच्या आणखी एका नवीन संचालकाने बक्षीसाचा ड्राफ्ट तयार असून खात्यात जमा करण्यात येईल त्यासाठी बँकेची फि म्हणून दोन लाख जमा करा असा संदेश सोमनाथच्या मेलवर पाठविला.

पुन्हा दोन लाख कूठून आणायचे.. सोमनाथचं ड़ोकं गरगरायला लागलं. नक्कीच काहितरी काळंबेरं आहे याची शंका सोमनाथच्या मनात आली. आपली फसवणूक होतेय... मीना सांगत होती तिचं ऐकलं असतं तर हि वेळ आली नसती या विचाराने सोमनाथ मटकन खाली बसला.

काही झालं तरी कंपनीला धड़ा शिकवायचा या विचाराने सोमनाथने पोलीस ठाणे गाठले. इन्सपेक्टर चव्हाणना सोमनाथने घड़लेली हकिकत सांगून वेळोवेळी भरलेल्या पैशाची पावती दाखवली. इन्सपेक्टर चव्हाणानी कपाळावर हात मारून घेत अहो तुमच्या सारखे सुशिक्षित कसे बळी पड़तात या प्रकाराला .. ऑनलाईन फसवणूक करणारी टोळी असून सहजासहजी तुम्हाला कोण पाच लाख पौंड़ देईल याचा विचार तरी करायचा असे चव्हाण इन्सपेक्टरनी सांगताच सोमनाथचा चेहरा खरर्कन उतरला.

“हवालदार यांची तक्रार नोंदवून घ्या” असे आदेश इन्सपेक्टर चव्हाणानी दिले. आणखी एक सुशिक्षित बळीचा बकरा आला अशा नजरेने हवालदार काकड़ेनी सोमनाथकड़े पाहत तक्रार नोंदवून घेतली.

# पुनर्भेट

पोलीस खात्यात नोकरी करताना संवेदना हरवून जातात असा समज आहे. परंत अंगावर असलेल्या खाकी वर्दीत देखील माणुसकि दड़लेली असते याची हि कथा...

दोन दिवसापासून सुरू असलेला पाऊस मिनिटभर देखील थांबायचे नाव घेत नव्हता. टेकड़ीवर वसलेली ठाकूरवाड़ी कोंबड़ीनी पिल्लाना पंखाखाली घेतल्यावर जसा चिवचिवाट बंद व्हावा तशी शांत झालेली. टेकड़ीखाली ओढ्याला पाणी असल्यामुळे येजा करण्याचा रस्ताच बंदच झालेला. ठाकूरवाड़ी जणू काय या जगापासून आलिप्त झालेली. पावसाळी अंधारलेल्या वातावरणामुळे घड्याळाचे काटे देखील सुस्तावल्यासारखे पुढे सरकत होते.

महादूने भिंतीवरच्या घड्याळाकड़े नजर टाकली सकाळचे दहा वाजत आले होते. महादू त्या भागातला पोलीस पाटील होता. आज काहिहि करून पोलीस चौकी गाठावी लागणार.... खुनातला आरोपी रवि पॅरोलवर सुटून वाड़ीत आलाय. त्याची माहिती पोलीसाना द्यावी लागणार होती. पण पाऊस थांबायचं नाव घेत नव्हता. महादूने खिड़की ऊघड़ून नजर बाहेर नजर टाकली. तसा पावसाचा सपकारा चेहऱ्यावर बसला. खिड़कीची एक झड़प अर्धी बंद करत महादू बाहेर न्याहळू लागला. ओढ्याचं पाणी शेतात घुसल होतं. ओढ्याच्या पलीकड़चा रस्ता देखील निर्मनुष्य झालेला. पाऊस थांबला तर दोन तासात ओढ्याचं पाणी ऊतरंल

आणि मग पलीकड़े जाता येईल असा विचार करून महादूने खिड़कीची झड़प ओढून घेतली.

क्षणात पुन्हा खिड़किची झड़प ऊघड़ली. टेकड़ीखाली काही तरी पाहिल्याचा भास महादूला झाला. महादू कोसळणाऱ्या पावसातून पुन्हा त्याच दिशेला पाहू लागला. एक मानवी आकृती ओढ्याजवळ बसलेली. एवढ्या पावसात कोण असेल? महादूला राहवेना. घराचं दार ऊघड़ून हातात छत्री सांभाळत महादू अंगणाच्या कोपऱ्यात आला. टेकड़ीवरून ओढ्याजवळ दिसलेली मानवी आकृती थोड़ी स्पष्ट दिसू लागली. कोणीतरी स्त्री मुसळधार पावसात ओढ्याजवळ शेतात बांधावर बसलेली होती.

महादूला राहवेना त्याने पत्नीला आवाज दिला... “लता, ओढ्यापाशी जावून येतो... कायतरी गड़बड़ आहे..” असं म्हणत महादूची पावलं टेकड़ीवरच्या निसरड्या वाटेने ओढ्याच्या दिशेने निघाली.

शेतात गुढघाभर चिखल झालेला. महादू कसाबसा वाट काढत बांधाजवळ पोहचला. बांधावर पावसात भिजत बसलेली स्त्री वाड़ीतली नव्हती. साधारण पस्तीशीची आसपास.. लुगड़ं भिजून अंगाला चिकटलेलं. केस विस्कटलेले.. मळकटलेला चेहरा थोड़ाफार पावसात धुवून गेलेला.. नजरेत शून्य भाव. स्त्रीची अवस्था पाहून महादूला वाईट वाटले. छत्री सांभाळत महादूने तिच्या समोर ऊभा राहिला.

“बाय कूठल्या वाड़ीतली? वाट चुकलेय का?” महादूच्या प्रश्नामुळे स्त्री एकदम भेदरली.

“घाबरू नकोस.. मी पोलीस पाटील आहे या वाड़ीतच राहतो” असं सांगत महादूने तिला धीर दिला. थोड़ंफार समजल्यासारखं स्त्रीच्या चेहऱ्यावरून दिसत होतं.

“तुझ नाव काय?” महादूच्या प्रश्नावर काहितरी आठवण्याचा प्रयत्न करत त्या स्त्रीने बोलण्याचा प्रयत्न केला;परंतु तोंड़ातून शब्दच फूटेना. कित्येक दिवसापासून हि बाई ऊपाशी असावी असा विचार महादूच्या मनात आला. घरातून काहितरी खायला आणूण द्याव म्हणून महादू परत टेकड़ीच्या दिशेने निघाला. दारात लता ऊभीच होती. महादूने सगळा प्रकार लताला सांगितला.

“अहो खायला देते पण त्या बापड़ीला पावसात भिजत ठेवण्यापेक्षा घराकड़े घेवून यायचं.. गारठून जीव जाईल कि तिचा.” लताचं बोलणं खरं होतं.. अंगावरचं लुगड़ं भिजून बिचारी कूड़कूड़त बसली होती. महादू पुन्हा मागे वळला. यावेळी लतापण बरोबर होती. लताला बघताच माहेरवाशीन भेटल्याची चमक त्या स्त्रीच्या ड़ोळयात आली. तिची अवस्था बघून लताला गहिवरून आलं. महादू आणि लताने आधार देत स्त्रीला घराच्या पड़वीत आणल. लताने ताटात भाकरी आणि भाजी आणून त्या स्त्रीच्या पुढ्यात ठेवली. कित्येक दिवसाची ऊपाशी असलेल्या स्त्रीने ताटातली भाकरी मिनिटात संपवली.

महादूने लताला खुणेच इशारा केला तशी लता पुन्हा आत गेली. एक आणखी भाकर तिच्या ताटात वाढली. समोर ठेवलेला तांब्यातील पाणी अर्धअधिक अंगावर सांड़वत प्यायलावर चेहऱ्यावर तरतरी आलेली पाहून लताला समाधान वाटलं. तिच्या बाजूला बसत “नाव काय बाई तुझ?” असा प्रश्न केला.

“सुनंदा” एवढेच शब्द तिच्या तोंड़ातून बाहेर पड़ले.

“कूठल्या वाड़ीतली.. पत्ता काय” विचारल्यावर सुनंदाचा गोंधळ उड़ाला.. तिला काहिच आठवत नव्हतं.

“अग नंतर विचारपूस कर... अगोदर एखाद जुन लुगड़ दे तिला.. भिजून काय अवस्था झालेय बघ” असं महादूने सांगताच लतानी सुनंदाला आतल्या खोलीत नेलं. सुनंदा तरणीताठी होती.. मनावर परिणाम झालेला दिसत होता. त्यातूनच

घर सोड़लं असावं असा अंदाज महादू मनाशी बांधत होता. तसं असेल तर पोलीसाना माहिती द्यावी म्हणजे तिची घरातल्या मंड़ळीचा पोलीस शोध घेतील या विचारानी महादूने पोलीस ठाण्यात फोन लावला.

ठाणे अंमलदार कदम याने फोन उचलला. पोलीस पाटलांचा आवाज कदमने ओळखला. “बोला पाटील... काय खबर?” असं कदमने विचारल्यावर महादूने सुनंदाची हकिगत सांगितली.

“अहो कूठ ड़ोक्याला ताप करताय.. अगोदरच काय कमी भानगड़ी आहेत काय? आली तशी जाईल आपल्या वाटेने.” हवालदार कदमचं ऊत्तर ऐकून महादूचा हिरमोड़ झाला. सुनंदा एकटी कूठ जाईल. शिवाय तरणीताठी असल्यामुळे काय वाईट प्रकार घड़ला तर या विचाराने महादूला काहिच सुचेना.

तीन दिवस ऊलटून गेले होते. पावसाने उघड़ीप दिली होती आणि तीन दिवसात लताचा पाहुणचार घेवून सुनंदा बरीच सावरली होती. सुनंदा पूर्ण नाव सांगत होती. रागाच्या भरात घर सोड़ून आलो. एवढच सांगत होती. पण कधीही चार भिंती बाहेर न पड़लेल्या सुनंदाला गावाच नावच आठवत नव्हतं. फक्त नावावरून सुनंदाचे नातेवाईक कसे शोधायचे असा विचार करत महादू पड़वीत बसला होता. तेवढ्यात समोरून येणाऱ्या हवालदार महेश करमरकरना पाहून झटकन ऊठला. साहेब बरं झालं आलात असे म्हणत खुर्ची पुढे सरकवत करमरकरना खुर्ची बसायला दिली. पाटील वाड़ीतल्या रम्याच वॉरंट घेवून आलोय.. घरी आहे का? असा प्रश्न हवालदार करमरकरना विचारला.

“साहेब पाऊस होता तर दोन दिवस रम्या घरीच होता. पण आता हुड़कायला लागंल”

"पोलीस पाटील म्हणून तुम्ही मदत करा" असे हवालदारने महादू सांगितले. साहेब मदत करतो पण मलापण एक मदत करा असे म्हणत महादूने सुनंदाची सर्व हकिगत हवालदार करमरकरना ऐकवली तसेच पोलीस चौकीत फोन केल्यावर कदमने दिलेल ऊत्तर देखील सांगितले.

महादूची वाड़ी करमरकरांच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत नव्हती. आरोपी रम्याला केवळ वॉरंट बजावण्याकरिता ते आले होते. महादूचं आणि करमरकरांच बोलणं सुरू असताना लता सुनंदाला घेवून बाहेर आली. पोलीस पाटील महादू सांगत होता ते खंर होतं. माणुसकि दाखवत जर महादूचं कूटूंब एवढी मदत करत असेल तर आपलं देखील कर्तव्य आहे या भावनेनी करमरकरनी मदत करण्याची तयारी दाखवली.

पोलीस खात्यातील अनुभवाच्या जोरावर करमरकरानी सुनंदाला बोलत करण्याचा प्रयत्न केला. सुनंदाला एकेक गावाची नाव सांगत असताना नागठाणे ऐकताच तिचा चेहरा फूलला. सुनंदाच गाव तर कळलं होतं. टेकड़ी ठाकूरवाड़ीपासून साठ किलोमीटर. एवढ्या दूर सुनंदा आली कशी या विचाराने लता आणि महादू एकमेकाकड़े पाहू लागले. आता प्रश्न होता फक्त तिच्या नातेवाईकांचा शोध लागण्याचा. हवालदार करमरकरानी नागठाणे पोलीस ठाण्यात फोन लावला. सुनंदाच पूर्ण नाव सांगत मिसिंग दाखल आहे का याची विचारणा केली. परंतु या नावानी कुठलीच मिसिंग नसल्याचे ऊत्तर पलीकड़ून मिळाले. नाव, आड़नाव आणि गाव यापलीकड़े सुनंदाला काहिच आठवत नव्हते. तिची मानसिक स्थिती बिघड़लेली त्यामुळे तिच्या नातेवाईकांपर्यंत पोहचणे अवघड़ होतं.

"सुनंदाला तिच्या घरी पोहचतं करू" असं आश्वासन देवून हवालदार करमरकर ठाकूरवाड़ीतून निघाले खरे परंतु सुनंदाला तिच्या घरी कस सोड़ता येईल याच विचारचक्र त्यांच्या ड़ोक्यात सुरू होतं. अचानक त्याना नागठाण्याचा त्यांचा मित्र प्रभाकरची आठवण झाली. काही वर्षापूर्वी कोर्टात ओळख झालेली. प्रभाकर

त्या भागातील एका पक्षाचा कार्यकर्ता होता. भानगड़ीच्या केसमध्ये कोर्टाच्या फेऱ्या सुरू होत्या. प्रभाकर मदत करू शकेल या विचारानी करमरकरानी प्रभाकरला फोन लावला. सुनंदा विषयी त्यानी सांगितली.

एवढ्या मोठ्या नागठाण्यात सुनंदाचे नातेवाईकांच शोध घेण म्हणजे दिव्यच होतं. परंतु हवालदार करमरकरांसाठी प्रभाकर कामाला लागला. प्रभाकर त्या भागातला राजकिय नेता असल्यामुळे ओळखी होत्या. दोनच दिवसात सुनंदाच्या घरचा पत्ता मिळाला. प्रभाकरने हवालदार करमरकराना फोन केला.

“साहेब सुनंदाचा पत्ता मिळालाय. वर्षभरापासून घर सोड़ून गेली आहे. घरात नवऱ्याबरोबर भांड़ण करू बाहेर पड़ली होती. पाच मुलं आहेत सुनंदाला. ती गेल्यानंतर दारूड़ा नवरापण गेलाय घर सोड़ून. बिचारी लहान पोरं आईबाप असून अनाथ झालीत”.

प्रभाकरच बोलणं ऐकून हवालदार करमरकरना वाईट वाटलं. करमरकरानी पोलीस पाटील महादूला फोन करून सुनंदाची हकिगत सांगितली.

“पाटील, आता जबाबदारी वाढली. सुनंदाला कोणी नातेवाईक नाही.. लहान पोरच आहेत.. तिला घरी सोड़ण्याची जबाबदारी आपली आहे.” हवालदाराच बोलणं सुरू असताना लता देखील बाजूला होती.

“वर्षभर सुनंदा भटकतेय. नशीब काही बरंवाईट झालं नाही. देवानीच आपल्याकड़े धाड़ली सुनंदाला” असे लताला बोलली. लताने पिशवी दोन नवी लुगड़ी आणि एका पिशवित खाण्याच्या वस्तू भरून महादूच्या हातात दिल्या.

ओढा ओलांड़ून महादू सुनंदाला घेवून रस्त्यावर आला. महादूला नागठाणेला कसं जायचं माहिती नव्हतं. हवालदार करमरकर स्वतः आलेलं. पुढच्या स्टॉपवरून एसटी पकड़ली. सुनंदाला मागच्या सीटवर बसवली. महादू शेजारी बसला होता. नादात सुनंदा पटकन एसटीतून उतरेल या विचारानी करमरकर

देखील लक्ष ठेवून होते. एसटी पेण पर्यंत होती. पुढे दुसरी एसटी पकडून नागठाणे गाठावे लागणार होते. ओळखीचा परिसर दिसताच एसटीच्या खिडकितून सुनंदाची नजर भिरभरू लागली. आठ दिवसात न दिसलेला वेगळाच आनंद सुनंदाच्या चेहऱ्यावर दिसत होता.

एसटी नागठाण्याला पोहचली. प्रभाकर खाली वाट पाहत होता. हवालदार करमरकर, महादूच्या पाठोपाठ सुनंदा खाली उतरले. प्रभाकरच्या गाडीत बसून सर्वजण निघाले. मुख्य रस्त्यावरून गाडी कच्च्या रस्त्याला लागली. कच्ची वाट सुनंदाला ओळखीची वाटू लागल्यावर पोरांच्या आठवणीने तिचा कंठ दाटला. बाबू, पऱ्या पटापटा मुलांची नाव घेवून सुनंदाला रडू कोसळले. प्रभाकरने गाडी मोहाची वाडी समोर थांबवली. तशी सुनंदाने वाऱ्याच्या वेगाने गाडीतून उतरत समोरच्या कूडाच्या घरात शिरली. आई शिवाय पोरकी झालेली पोर सुनंदाला बिलगली.

हवालदार करमकराकडे पाहत “साहेब तुमच्यामुळे आज ताटातूट झालेली माय लेकर भेटली” असं म्हणताना महादूच्या ड़ोळयात पाणी तरळले.

# मानपान

थंडीचा कड़ाका वाढला होता.. महादूने झोपड़ीजवळ पडलेल्या काटक्या पालापाचोळा जमा केला. गवताची पेंढीमधून थोडासा पेंढा काढला. बंड़ीच्या खिशातून माचिस काढून जाळ केला. भरभर पेंढा जळू लागला तशी धग अंगावरच्या घोंगड़ीतून जाणवायला लागल्यावर महादू थोड़ माग सरकून बसला. कानावर लावलेली बिड़ी शेकाटीच्या जाळावर धरून दोन झुरके मारत महादूने मळयाकड़े नजर फिरवली. साठी ओलांडलेल्या महादूची नजर पण थकलेली. एकुलती एक पोरीच लग्न लावून दिलेले बायको दोन वर्षांपूर्वी सोड़ून गेलेली.. त्यामुळे आला दिवस ढकलायचा म्हणून पाटलाच्या मळयावर राखणदारीच काम करायचा. दोन वेळच्या जेवणाची सोय झाली होती. गावाच्या बाहेर पाटलाचा मळा. जवळून रेल्वे लाईन गेलेली. टारगट पोरांचा पिण्याचा अड्ड़ा गावाबाहेर.. त्यामुळे जास्त झाली कि पोपटीचा बेत व्हायचा.. मग सर्व टोळधाड़ मळयात शेंगा चोरायला यायची. महादू राखणीला आल्यापासून पोरं जरा वचकून होती. महादूने शेकोटीपासून थोड्या अंतरावर बिछाना टाकला. कोपऱ्यापासून हात जोडत महादू आड़वा झाला.

सकाळचे दहा वाजले तरी महादू वाड्यावर आला नाही याच पाटलीन बाईला आश्चर्य वाटलं. अहो म्हाताराबा वाट चुकला का आज.. दिस नाय उजाड़त तर च्यासाठी ठाण मांडून बसतो. आज काय झालं. पाटलीन बाईचं बोलणं खरं होतं.. चहा महादूचा जीव कि प्राण...

पाटील झोपाळयावरून उठले.. पायात चपला चढवित.. “जरा मळयाकड़ून चक्कर मारून येतो..” असे म्हणून पाटील निघाले.

विझून राख झालेल्या शेकोटीचा ताबा कोंबड्यानी घेतला होता. राखाडी वाखरत सर्व धूळ महादूच्या बिछान्यावर ऊडवत होत्या. आज बिछानापण उचलला नाही.. महादू विहिरीवर असेल असं मनात बोलत पाटील बांधांवर आले.. बांधावरून नजर फिरवताना समोरचे दृष्य पाहून पाटलाना धक्का बसला. महादू रक्ताच्या थारोळयात पड़ला होता. धारदार हत्याराने महादूवर वार करून त्याचा मृतदेह शेतात टाकला होता. क्षणभर पाटलाना काहिच सुचेना.. स्वतःला कसेबसे सावरत पाटलानी पोलीस चौकीत फोन लावला.

दहा मिनिटात पोलीस जीप पाटलांच्या मळयावर पोहचली. तोपर्यंत महादूचा खून झाल्याची वार्ता गावभर पसरलेली. बायाबापड्यांची गर्दी झालेली. पोलीसाना पाहताच बघे माग सरकले. इन्स्पेक्टर थोरात महादूच्या प्रेताजवळ पोहचले. अतिशय क्रूर पद्धतीने महादू शरिरावर वार करण्यात आले होते. इन्स्पेक्टर थोरातने सोबतच्या कर्मचाऱ्यांना पंचनामा करण्यात सांगून महादूच्या वस्तू ताब्यात घ्यायला सांगितल्या.

थोरातानी मोर्चा पाटलांकडे वळविला. “महादूच कोणाशी वैर, भानगड?” असा प्रश्न थोरातानी केला..

“तसा नाय बा.. साधा सरळसोट गरिब माणूस.. कोणाच्या अध्यात ना मध्यात” पाटलानी माहिती पुरवली. महादूचा बॉड़ी पोस्टमार्टम करता नेली. जवळच्या गावाला असलेल्या महादूच्या पोरीला बोलावणे पाठविले. इन्स्पेक्टर थोरातानी गावात महादू विषयी माहिती काढायला सांगितली. परंतु वावगं काहिच कानावर आलं नाही. महादूची पोरं नंदा आणि जावई सदा धाय मोकलून रड़त होते. बा.. ला कोणी ठार मारलं यावर नंदाचा विश्वासच बसत नव्हता. जावई सदा गड़बड़ा लोळत होता. माझ्या सासऱ्याला कोणी मारलं साहेब शोधून काढा.. फासावर द्या असं सदा सारखं बोंबलत होता.

पोलीस खात्यात काळयाच पांढर केलेल्या थोरात साहेबांना सदाचं रड़ण खटकले. सदावर नजर ठेवण्याचे आदेश त्यांनी हाताखालच्यां कर्मचाऱ्यांना दिले.

त्याच रात्री सदा दारूच्या गुत्त्यावर दारू ढोसायला आल्याची माहिती खबऱ्यांनी पोलीसाना दिली. मनोसोक्त दारू प्यायलेला सदाला शुध्दच नव्हती. सासरा मेला म्हणून टाहो फोड़णारा सदा लगेच दारू प्यायला येतो हे थोरात साहेबांना पटेना.. “सदाला अड्ड्यावरून थेट चौकीत आणा” असे आदेश थोरात साहेबांनी दिला.

तर्रर झालेल्या सदाची वरात चौकीत आणली. “सदाशेठ तुमच्या सासऱ्यांचा खुनी सापडला” असे थोरात यांनी सांगताच दारूच्या नशेतल्या सदाच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. थोरात साहेबांचा फ़ॉर्म्युला लागू पडला होता. सदाला काहितरी माहित होतं.. पोलीसांपासून सदा लपवत होतं.. सदा तू नाव सांगतो का आम्ही सांगू.. तसा सदा गांगरला.. काहिच माहिती नसल्याचे भाव आणण्याचा केविलवाणा प्रयत्न करू लागला.

त्याक्षणी जोरदार मुस्काटात बसलेला सदा खुर्चीतून खाली पड़ला. थोरात साहेबांचा राकट हात कानाखाली बसताच सदाची दारू उतरली. “साहेब खरं सांगतो.. मला मारायचं नव्हतं.. सासऱ्याला.. पण दारूच्या नशेत घड़लं..” असं सांगत सदा रड़ू लागला.

“अरे पण का मारलस म्हाताऱ्याला?” थोरात साहेबांनी प्रश्न केला.

“सायेब मी त्याचा एकुलता एक जावई पण कधी मानपान नाही करायचा. चार लोकांच्यात पण एकेरी हाक मारायचा. मला खटायकचा.. एकदोन सांगून बघितलं.. तर म्हणतो कस मोठं जागिरदार तुम्ही.. तेव्हापासून म्हातार ड़ोसक्यात गेल होतं. रात्री मळयावर एकटंच असत. तेव्हा गाठून काटा काढला.” सदाचा कबुलीजबाब ऐकून थोरातानी कपाळावर हात मारला..

“अरे आता कसला मानपान भेटणार.. आता खुनी शिक्का बसला शिवाय जेलची हवा खावी लागणार ती वेगळीच.”

परंतु मानपान न झालेला सदा निर्विकार बसून होता.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे

जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.